# प्रसिद्धी विभाग २०१९ – २०

## वनस्पतिशास्त्र विभाग

सकाळ

# रानभाज्यांचा आहारात उपयोग करा

## राजगुरुनगर येथे देवेंद्र बुट्टे पाटील यांचे आवाहन

**राजगुरुनगर, ता. ८ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये वनस्पतिशास्त्र विभागातर्फे रानभाजी व विदेशी भाजी प्रदर्शनाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिकराव पाटोळे आदी उपस्थित होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. एस. एन. टाकळकर, डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

पावसाळ्यात आपला आहार अधिक पौष्टिक आणि वैविध्यपूर्ण करण्यासाठी या रानभाज्यांचा उपयोग आहारात करावयास हवा. पूर्णतः सेंद्रिय असलेल्या या अन्नघटकांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे आहे, असे बुट्टे पाटील यांनी सांगितले.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वाघाटी, करटूल, सापकांदा, चुंच, पाथरी, माकडशेंदुडी, हमामबटाटा, चिचुर्डी, पानभाजी, कुंजीरडा अशा सुमारे ३३ प्रकारच्या रानभाज्या तसेच सुमारे २९ प्रकारच्या विदेशी भाज्या मांडल्या.

विभागप्रमुख प्रा. जी. एल. भोर, डॉ. के. एम. नितनवरे, डॉ. संगीता जे. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी खेड तालुक्यातील पश्चिम भागातील गावांना भेटी देऊन तेथील स्थानिक नागरिकांच्या साह्याने रानभाज्यांचे संकलन केले. अंकुश राक्षे, शंकर राक्षे, राहुल आढारी यांनी प्रदर्शनाला भेट दिली. प्रास्ताविक प्रा. जी. एल. भोर यांनी केले. डॉ. के. एम. नितनवरे यांनी आभार मानले.

Pune, District-Today
09/08/2019 Page No. 4

लोकमत

# रानभाजी व विदेशी भाजी प्रदर्शनाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयामध्ये वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने रानभाजी व विदेशी भाजी प्रदर्शनाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. विविध रानभाज्या आणि विदेशी भाज्या या प्रदर्शनात ठेवण्यात आल्या होत्या.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वाघाटी, करटूल, सापकांदा, चुंच, पाथरी, माकडशेंदुडी, हमामबटाटा, चिचुर्डी, पानभाजी, कुंजीरडा अशा सुमारे ३३ प्रकारच्या रानभाज्या; तसेच ब्रोकोली, झुकिनी, चायना कॅबेज, लोला-रोसा, एवोकॅडो, थाईवांगी, पाकचोई, थाईम, रोसमेरी,पासेर्ली अशा सुमारे २९ प्रकारच्या विदेशी



**हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात रानभाज्या व विदेशी भाज्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.**

सेवनाने होणारे फायदेही उपस्थितांना सांगितले.

वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा.

डॉ. संगीता जे. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी खेड

गावांना भेटी देऊन तेथील स्थानिक नागरिकांच्या साह्याने रानभाज्यांचे संकलन केले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिकराव पाटोळे यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. एस. एन. टाकळकर, डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जी. एल. भोर यांनी, तर आभार डॉ. के. एम. नितनवरे यांनी मानले.

# प्रदर्शनात मांडल्या २९ विदेशी, ३३ रानभाज्या

## हुतात्मा राजगुरूनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध भागातून केले संकलन

राजगुरूनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये वनस्पती शास्त्र विभागाच्या वतीने रानभाजी व विदेशी भाजी प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शात सुमारे ३३ रानभाज्या, तर २९ प्रकाराच्या विदेशी भाज्या मांडल्या होत्या.

येथील महाविद्यालयात आयोजित रानभाजी व विदेशी भाजी प्रदर्शनाचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर,

**ब्रोकोली, झुकीनी, चायना कॅबेज, लोला-रोसाचाही समावेश**

अॅड. माणिकराव पाटोळे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा.एस.एन.टाकळकर, डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वाघाटी, करटूल, सापकांदा, चुंच, पाथरी, माकडशेंदुडी, हमामबटाटा, चिचुर्डी, पानभाजी, कुंजीरडा अशा सुमारे ३३ प्रकारच्या रानभाज्या, तसेच ब्रोकोली, झुकीनी, चायना कॅबेज, लोला-रोसा, अॅव्हाकोडा, थाई वांगी, पाकचोई, थाईम, रोसमेरी, पार्सेली अशा सुमारे २९ प्रकारच्या विदेशी भाज्या मांडल्या होत्या, तसेच या भाज्यांच्या सेवनाने होणारे फायदेही उपस्थितांना सांगितले. वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्रा. जी. एल. भोर, डॉ. के. एम. नितनवरे, डॉ. संगिता जे. एस यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी खेड तालुक्यातील पश्चिम भागातील गावांना भेटी देऊन तेथील स्थानिक नागरिकांच्या साह्याने रानभाज्यांचे संकलन केले.



**राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात रानभाजी व विदेशी भाजी प्रदर्शनची पाहणी करताना मान्यवर.**

याप्रदर्शनासमहाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांसह पंचायत समिती सदस्य अंकुश राक्षे, नगरसेवक शंकर राक्षे, राहुल आढारी व अन्य नागरिकांनी भेट देऊन रानभाज्यांचे महत्त्व जाणून घेतले. प्रास्ताविक प्रा. जी. एल. भोर, तर डॉ. के. एम. नितनवरे यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख